---

मनोगत

---

दलित साहित्याचा प्रवाह हा जिवंत,जीवनदायी प्रवाह आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील अपूर्व आणि असामान्य घटना म्हणून चळवळीचा उल्लेख करावा लागतो. विद्रोहाचा प्रभावी आविष्कार करून मराठी कवितेच्या इतिहासात नवे पर्व उलगडणाऱ्या दलित कवितेने स्वतंत्ररूप धारण केले आहे. गेल्या दोन दशकांत काही चांगल्या दलित साहित्यकृती प्रसिध्द झाल्या आहेत. नामदेव ढसाळांच्या ' गोलपिठा ' चे लेखन दलित जाणिवेतून झालेले असले तरी ते वर्गीय कक्षा ओलांडून कुणाच्याही अनुभवाचा विषय आहे. दलित समाज नि त्यांचे साहित्य या विषयी एकूणाच समाजाची आस्था नि जिज्ञासा वाढत आहे. दलित साहित्यासंबंधीच्या आस्थेपोटी आणि जिज्ञासेपोटीच प्रस्तुत शोध निबंधाचा प्रपंच केला आहे.

हा शोधनिबंध म्हणजे दलित साहित्याचा इतिहास नव्हे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आंदोलनामुळे दलित समाजात नवचैतन्य आणि स्वाभिमान निर्माण झाला. दलित साहित्याची चळवळ सुरू झाली. या चळवळीमुळेच जे लेखनास प्रवृत्त झाले अशा नामदेव ढसाळांच्या साहित्यनिर्मितीचा विचार या शोधनिबंधात केला आहे. त्यांच्या कवितेच्या प्रेरणा व संदर्भ पूर्णत: सामाजिक असूनही ते कलारूप कसे धारण करते याचा शोध घेण्याचा प्रयत्न येथे केला आहे. त्यांच्या कवितेच्या आशय अभिव्यक्तीरूपा बरोबरच शब्दकला, प्रतिमासृष्टींचा विचारही या शोधनिबंधात करून त्यांच्या कवितांनी जाणिवांचे क्षेत्र खरोखरच विशाल व समृध्द केले आहे का याचा शोधघेण्याचाही प्रयत्न केला आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
SHIVAJI UNIVERSITY LIBRARY

हा अभ्यास करताना वेळोवेळी केलेली चर्चा, मार्गदर्शन, साधनग्रंथ व जिव्हाळ्याचे प्रेम दिले डॉ. ल. रा. नसिराबादकर यांनी. त्यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे आणि साहाय्यामुळे मी खूप आनंदित आहे. मी त्यांचा मनःपूर्वक ऋणी आहे.

या शोधनिबंधाचे टंकलेखन श्री एन. डी. भोईटे, यांनी सुबकपणे आणि सत्वर करून दिले, त्यांना मनःपूर्वक धन्यवाद.

इस्लामपूर
शुक्रवार दि. ८-६-१९८४.

(शरद तुकाराम भोसले.)